उमेश सुर्वे, तुळजापूर.

□ **मधुबाला, मीनाकुमारी, राखी, नरगिस, गीता दत्त, जया भादुरी, सुरय्या या अभिनेत्रींनी चित्रपटात बेदिंग सूट परिधान केलाय का? कोणत्या चित्रपटात? या चित्रपटाचे दिग्दर्शक कोण? नायक कोण?**

– गीता दत्त अभिनेत्री नव्हे तर पार्श्वगायिका होती. यामुळे तिने बेदिंग सूट परिधान करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मधुबाला, मीनाकुमारी, जया भादुरी, सुरय्या यांनी कोणत्याच चित्रपटात कधी बेदिंग सूट परिधान केला नाही, राखीने *शर्मिली*त बेदिंग सूट परिधान केला होता. समीर गांगुली या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. नायक शशी कपूर होता. नरगिसने *आवारा*त बेदिंग सूट परिधान केला होता. राज कपूर या चित्रपटाचा दिग्दर्शक व नायक होता.

□ **अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, दिलीपकुमार चित्रपटात येण्यापूर्वी काय करत होते?**

– अमिताभ चित्रपटात येण्यापूर्वी कोलकात्याला शिपिंग कार्पोरेशनमध्ये नोकरीला होता. धर्मेंद्र लुधियानाला पेट्रोल पंपावर नोकरी करत होता. चित्रपटासाठी लागणारे नकली दागिने पुरवणे हा जितेंद्रच्या घरचा व्यवसाय होता. हाच व्यवसाय नट बनण्यापूर्वी तो चालवत होता. दिलीपकुमार पुण्यास मिलिटरी कँपमध्ये कँटिन चालवत होता.

चंद्रकांत मावळे, नारायणगाव.

□ **एकही गाणं नसलेला चित्रपट कोणता?**

– १९३५चा *ठकीचे लग्न* हा मराठी चित्रपट भारतातला पहिला गीतविरहित चित्रपट आणि १९३७चा *नवजवान* हा हिंदीतला पहिला गीतविरहित चित्रपट. त्यानंतर *तुफानी स्वार, मुन्ना, कानून, इत्तेफाक, भुवनशोम, अर्धसत्य, दोन्ही घरचा पाहुणा, कलावंत विकणे आहे, सवत माझी लाडकी, भस्म, बनगरवाडी, सासर झालं माहेर* यासारखे अनेक गीतविरहित चित्रपट हिंदी व मराठीत निर्माण झाले आहेत. किशोरकुमार संगीतकार-गायक-अभिनेता असला तरीही १९८२ साली त्याने *दूर कहीं वादीयों में* हा गीत विरहित चित्रपट निर्माण केला होता.

विघ्नेश सावंत, अहमदनगर.

□ **मुक्रीला कधी पारितोषिक मिळालंय का? त्याचा पहिला चित्रपट कोणता?**

– मुक्रीला कधी पारितोषिक मिळालेलं नाही. १९४१चा *नादान* त्याचा पहिला चित्रपट.

रविकांत साखरे, अहमदनगर.

□ ***मुक्ती, जब याद किसी की आती है, कही दिन कही रात, जानम समझा करो, फिर सुबह होगी, इम्तिहान, घर घर की कहानी* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? संगीतकार कोण?**

– *मुक्ती* नावाचे तीन चित्रपट आतापर्यंत निघालेत. १९३७ ला पहिला. नायक-नायिका पी.सी. बारुआ-काननबाला. संगीतकार पंकज मलिक. १९६०ला दुसरा नायक-नायिका मोतीलाल-नलिनी जयवंत. संगीतकारः मोकाई चक्रवर्ती. १९७७ला तिसरा नायक-नायिकाः संजीवकुमार, शशी कपूर, नायिकाः विद्या सिन्हा. संगीतः आर.डी. बर्मन.

जब याद किसी की आती है १९६७ला आला होता. नायक-नायिकाः धर्मेंद्र-माला सिन्हा. संगीत मदनमोहन. *कही दिन कही रात* १९६८ला आला होता. नायक-नायिकाः विश्वजीत-सपना, संगीतः ओ.पी. नय्यर. *जानम समझा करो*चे नायक-नायिकाः सलमान खान-ऊर्मिला मातोंडकर, संगीतः अन्नू मलिक. *फिर सुबह होगी* १९५८ला आला होता. नायक-नायिकाः राज कपूर-माला सिन्हा. संगीतः खय्याम.

इम्तिहान नावाचे तीन चित्रपट आतापर्यंत आलेत. १९४९ला पहिला नायक-नायिकाः सुरेंद्र-मधुबाला, संगीतः श्यामबाबू पाठक. १९७४ला दुसरा नायक-नायिकाः विनोद खन्ना-तनुजा, संगीतः लक्ष्मीकांत-प्यारेलाल, १९९४ला तिसरा नायक-नायिकाः सैफअली खान-रविना टंडन, संगीतः अन्नू मलिक.

घर घर की कहानी या नावाचे तीन चित्रपट आलेत. १९४७ला पहिला नायक-नायिकाः नायमपल्ली-लीला चिटणीस. १९७०ला दुसरा नायक-नायिकाः बलराज साहनी-निरूपा राय, संगीतः कल्याणजी-आनंदजी. १९८८ला तिसरा नायक-नायिकाः ऋषी कपूर-जया प्रदा. गोविंदा-फराह, संगीतः भप्पी लाहिरी.

सुषमा कातकर, बोरिवली.

□ भगवान व गीताबाली या दोघांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणते?



अलबेलामध्ये भगवान-गीताबाली

– भगवान व गीताबाली *अलबेला* व *झमेला* या चित्रपटात एकत्र चमकले.

□ ***बापबेटी, बिराज बहू, दो बिघा जमीन, अब दिल्ली दूर नही* या चित्रपटांतील नायक-नायिका व बालकलाकार कोण?**

– *बापबेटी*तील नायक-नायिकाः रंजन-मृदुला, बालकलाकार बेबी तब्बसुम. आशा पारेखही या चित्रपटात बालतारका होती. *बिराज बहू*मधील नायक-नायिकाः अभी भट्टाचार्य-कामिनी कौशल. बालकलाकारः बेबी चांद. *दो बिघा जमीन*मधील नायक-नायिकाः बलराज साहनी-निरूपा राय. बालकलाकारः रतनकुमार-नाज. *अब दिल्ली दूर नही*चे नायक-नायिकाः मोतीलाल-सुलोचना. बालकलाकारः रोमी, मोहन चोटी, जगदीप. अमजद खानदेखील या चित्रपटात बालकलाकार होता.

वैजयंती शिर्सेकर, मालवण.

□ **दादासाहेब फाळके पुरस्कार केव्हा सुरू झाला? तो कोणत्या चित्रपटाला व नायक-नायिकेला सर्वात प्रथम मिळाला?**

– १९७० साली केंद्र सरकारने दादसाहेब फाळके यांच्या जन्मशताब्दीला फाळके पुरस्कार सुरू केला. हा पुरस्कार चित्रपट वा नायक-नायिकेला दिला जात नाही. चित्रपट व्यवसायाची प्रदीर्घ सेवा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीला दिला जातो. १९७०ला हा पुरस्कार सर्वात प्रथम अभिनेत्री देविका राणीला दिला होता. १९६१ पासून महाराष्ट्र सरकारने तीन सर्वश्रेष्ठ मराठी चित्रपटांना पारितोषिक देण्याची प्रथा सुरू केली. १९७४ साली यातील पारितोषिकांपैकी पहिल्या क्रमांकाच्या पारितोषिकाला दादासाहेब फाळके नाव दिले गेले आणि हे पारितोषिक सर्वात प्रथम वसंत पेंटर यांच्या *सुगंधी कट्टा* या चित्रपटाला मिळाले.